N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

**1. District (जिल्हा):** अहमदनगर **P.S.(ठाणे):** नेवासा

**Year (वर्ष):** 2024

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0397

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 17/04/2024 05:41

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार
   **Date From (दिनांक पासून):** 16/04/2024
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 16/04/2024
   **Time Period (कालावधी):** पहर 5
   **Time From (वेळेपासून):** 15:30 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 15:45 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 17/04/2024 **Time (वेळ):** 05:00 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 008

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 17/04/2024 05:11 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

**1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** **Beat No. (बिट क्र.):**

पूर्व, 22 किमी

**(b) Address (पत्ता):** कुकाणा दुरक्षेत्र,ता नेवासा,नेवासा

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** अनिल श्रीराम शिंदे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1980

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पाथरवाला,ता नेवासा,नेवासा,नेवासा,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पाथरवाला,ता नेवासा,नेवासा,नेवासा,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | tukaram bhimrao khedkar | | | 1. लव कुश बंग,मुकिंदपुर नेवासा, नेवासा फाटा,ता नेवासा,नेवासा ,नेवासा,अहमदनगर,महाराष्ट्र, भारत |
| 2 | नंदु पांडुरंग सरोदे | | | 1. देवसडे,ता नेवासा,नेवासा, नेवासा,अहमदनगर,महाराष्ट्र, भारत |
| 3 | पोपट सरोदे पुर्ण नाव माहीत नाह | | | 1. तेलकुडगाव,ता नेवासा,नेवासा, नेवासा,अहमदनगर,महाराष्ट्र, |

| | | | | | भारत |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे)**:**

**9. Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील)**:**

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 5000/रु रोख रक्कम | 5,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

5,000.00

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents** (प्रथम खबर हकीकत )**:**

फिर्याद नेवासा पोलीस स्टेशन जि.अ.नगर
दि.17/04/2024

मी अनिल श्रीराम शिंदे, वय- 44 वर्षे, धंदा- शेती रा.पाथरवाला, ता.नेवासा जि.अहमदनगर मो.नं. 9730733198.

समक्ष फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणी कुटुंबासह राहण्यास असुन, मी दि.12/04/2024 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, अहमदनगर येथील पोलीस निरीक्षक श्री. आल्हाट, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, अहमदनगर यांना मोबाईल व्दारे एका लोकसेवका विरुध्द माझी लाच मागणीची तक्रार सांगितली होती. त्यावेळी पोनि श्री. आल्हाट यांनी मला दुपारी कुकाणा ता. नेवासा येथे सुरक्षित ठिकाणी वाहनासह व लाच म्हणून देण्याचे रकमेसह हजर राहणेबाबत कळविले होते. त्याप्रमाणे मी दि.12/04/2024 रोजी साडेतीन वाजेचे सुमारास कुकाणा ता. नेवासा येथील सुरक्षित ठिकाणी हजर असताना पोनि आल्हाट हे सापळा पथक व पंच यांचेसह शासकीय वाहनाने मी थांबलेल्या सुरक्षित ठिकाणी 15/30 वा.चे सुमारास पोहोचले. मी त्यांना व त्यांचे सोबतचे अधिकारी, कर्मचारी तसेच पंच साक्षीदार यांना माझी ओळख सांगितली. पोनि आल्हाट यांनी त्यांची स्वतःची, सोबतचे अधिकारी पोनि श्रीमती देवरे, कर्मचारी व पंच यांची माझेशी ओळख करून दिली.

त्यानंतर मी माझ्यावर व माझ्या कुटुंबियांवर आमचे शेजारी हरिचंद्र शिंदे यांच्या पत्नीने नेवासा पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर नं.305/2024 भा.द.वि.कलम 324,323,143,147,148,149,504,506 प्रमाणे गुन्हा दाखल केलेला आहे. त्या गुन्हयाचा तपास लोकसेवक तुकाराम खेडकर हे करीत आहेत.खेडकर पोलीस हे विनाकारण मला कुकाणा चौकीला वारंवार बोलावुन घेवुन त्रास देत होते. मागील सहा सात दिवसापुर्वी माझ्या परिचयाचा नंदु सरोदे हा मला भेटला व त्यावेळी त्याने मला आमच्या वर दाखल असलेल्या गुन्हयात सहकार्य करण्याकरीता तुकाराम खेडकर पोलीस यांना काहीतरी अर्थिक तडजोड करुन त्यांना दहा हजार रुपये दयावे लागतील असे सांगितले. त्यावेळी माझ्या लक्षात आले की नंदु सरोदे हा माझ्याकडे तुकाराम खेडकर पोलीस यांचे करीता लाचेची मागणी करीत आहे.परंतु मला नंदु सरोदे व तुकाराम खेडकर यांना लाच देण्याची इच्छा नाही. त्यामुळे त्यांचेवर कारवाई करावी म्हणुन मी सविस्तर तक्रार लिहुन दिली.

त्यानंतर मी खेडकर पोलीस व नंदु सरोदे यांचे विरूध्द नोंदविलेल्या लाच मागणी तक्रारीची पडताळणी करण्याचे ठरले. पोनि श्रीमती देवरे यांनी मला व पंचांना लाच मागणी पडताळणी कारवाईत व्हाईस रेकॉर्डरचा वापर करण्यात येणार असले बाबत कळवून त्याच्या वापराबाबत माहिती समजावून सांगितली. त्यानंतर पोनि श्री. आल्हाट यांनी व्हाईस रेकॉर्डर मध्ये एक नविन मेमरीकार्ड घालून, व्हाईस रेकॉर्डर चालू करुन, त्या मेमरी कार्डमध्ये काहीही रेकॉर्ड नसल्याची माझी व दोन्ही पंचाची खात्री करून दिली. त्यानंतर पोनि श्रीमती देवरे यांनी लाच मागणी पडताळणी दरम्यान करावयाचे कारवाई बाबत मला व पंच नं.1 यांना सुचना समजावुन सांगितल्या. त्यावेळी खेडकर पोलीस व

नंदु सरोदे हे कोठे आहेत याबाबत खात्री करणेकरीता माझे वर नमुद मोबाईल नंबर वरुन नंदु सरोदे यांचा मोबाईल नंबर 7499716865 वर कॉल करुन नंदु सरोदे हे कुकाणा येथे असलेबाबत सांगितले. सदरचा कॉल व्हाईस रेकॉर्डर व्दारे रेकॉर्ड करण्यात आला. त्या दरम्यान नंदु सरोदे यांनी लवकर भेटण्याकरीता सुमारे बऱ्याच वेळा कॉल झाले. त्यादरम्यान नंदु सरोदे यांनी माझेकडे खेडकर पोलीस यांचे करीता 10,000/- रुपये लाचेची मागणी केली त्यावेळी मी त्यांना माझ्याकडे 5,000/- रुपये आहेत असे सांगितले. सदरचे सर्व कॉल व्हाईस रेकॉर्डर व्दारे रेकॉर्ड करण्यात आले. त्यानंतर पोनि श्री. आल्हाट यांनी व्हाईस रेकॉर्डर चालु करून देवुन मला माझेकडील एमएच-14-एके-8015 या दुचाकीवरुन मी व पंच नं 1 असे नंदु सरोदे यांची भेट घेण्यासाठी रवाना केले. त्याप्रमाणे मी पंचासह नंदु सरोदे यांची कुकाणा येथील तरवडी रोड वरील चहाच्या हॉटेलवर नंदु सरोदेची भेट घेण्यासाठी गेलो असता तेथे पोपट सरोदे हजर होते, त्यावेळी ते मला म्हणाले, नंदुला ठरल्याप्रमाणे करावे लागेल,तुमचे पन्नास हजारात सुध्दा आवरले नसते, मी तुमच्यासाठी चार बा-या हात जोडले, त्यानंतर त्याठिकाणी थोडया वेळाने नंदु सरोदे आले पण तेथे आमचे बोलणे झाले नाही, त्यानंतर मी व पंच क्र.1 असे सापळा पथक थांबले तेथे परत गेलो व वरीलप्रमाणे माहिती श्रीमती देवरे मॅडमला सांगीतली, त्यानंतर देवरे मॅडमच्या सुचनेवरुन मी खेडकर पोलीस यांना फोन केला व ते चौकीवर किती वाजता येत आहेत असे विचारले असता त्यांनी मी थोड्याच वेळात येतो असे सांगितले.

त्यानंतर पोनि अल्हाट यांनी व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझ्याकडे दिले व पंचासह मला कुकाणा चौकीवर खेडकर पोलीस यांची भेट घेण्यासाठी माझ्याकडील दुचाकी गाडी क्र. एम.एच.14 ए.के.8015 यावरुन रवाना केले.त्यानंतर मी व पंच क्र.1 असे कुकाणा चौकी येथे आलो असता खेडकर पोलीस, नंदु सरोदे व पोपट सरोदे असे तिघेजण हजर होते.त्यावेळी त्या तिघांसोबत मी माझ्या गुन्हयाबाबत चर्चा केली.त्यावेळी नंदु सरोदे खेडकर पोलीस यांना म्हणाले, ते दहा मध्ये फायनल झाल होत, यांच्याकडे पाचच हजार रुपये आहेत, त्यावेळी खेडकर पोलीस म्हणाले, मी तुम्हाला पैशासाठी कधी तान दिला नाही, तुम्ही मला गुन्हयाच्या तपासात मदत करा.माझ काय आहे दिल तरी मी खुश असतो नाही दिल तरी मी खुश असतो असे म्हणाले उदया नोटीसवर सहया करण्यासाठी या असे सांगीतले. त्यानंतर मी व पंच सापळा पथक थांबले तेथे परत आलो व वरीलप्रमाणे हकिकत देवरे मॅडमला सांगीतली. सदर दिवशी खेडकर पोलीस व त्यांचे सोबतचे खाजगी इसम नंदु सरोदे व पोपट सरोदे यांनी लाचेची रक्कम स्पष्ट न सांगीतल्यामुळे सदर दिवशी कारवाई स्थगीत करण्यात आली व पुढील कारवाई दिनांक 13/04/2024 रोजी करण्याचे ठरले व मला 13.30 वाजता कुकाणा येथे सुरक्षीत ठिकाणी हजर राहणेबाबत सांगीतले.

त्याप्रमाणे मी दिनांक 13/04/2024 रोजी कुकाणा येथे 13.30 वाजता सुरक्षीत ठिकाणी हजर होतो,थोडया वेळाने तेथे देवरे मॅडम व सापळा पथक आले, त्यानंतर माझ्याकडे व्हॉईस रेकार्डर चालु करुन दिले व पंच क्र 1 यांचे सोबत मला खेडकर पोलीस यांची भेट घेण्यासाठी कुकाणा चौकी येथे माझ्याकडील दुचाकी गाडी क्र. एम.एच.14 ए.के.8015 यावरुन रवाना केले. मी व पंच असे कुकाणा चौकीवर आलो त्यावेळी माझ्या कुटुंबीय ज्यांचेवर वरील प्रमाणे गुन्हा दाखल आहे ते नोटीसवर सहया करण्यासाठी कुकाणा चौकीवर आले होते तसेच त्याठिकाणी खेडकर पोलीस व पोपट सरोदे तेथे हजर होते, त्यावेळी आंम्ही खेडकर पोलीस यांनी दिलेल्या नोटीसवर सहया केल्या, त्यावेळी पोपट सरोदे मला म्हणाले, खेडकर साहेबाने नंदुला सांगीतले तेवढे तुला दयावे लागतील, तुला ते दहा दयावे लागतील असे म्हणाले, त्याठिकाणी माझे कुटुंबीय असल्यामुळे मी काहीएक बोललो नाही व पंचासह सापळा पथक थांबले तेथे परत आलो व वरील प्रमाणे हकिकत देवरे मॅडमला सांगीतली. त्यानंतर देवरे मॅडमच्या सुचनेवरुन नंदु सरोदेला फोन लावला पण त्यांनी तो उचलला नाही, त्यामुळे नंदु सरोदे व खेडकर पोलीस यांचेशी संपर्क झालेनंतर पुढील कारवाई करण्याचे ठरले, त्यानंतर मला गोपनियतेच्या सुचना देवुन घरी जाणेस मोकळीक दिली.

त्यानंतर दिनांक 16/04/2024 रोजी सकाळी 10.00 वाजेचे सुमारास मी खेडकर पोलीस यांना त्याचा मोबाईल नंबर 7021192525 यावर कॉल केला असता मी त्यांना माझा फोटो घेवुन चौकीला येवु का असे विचारले असता त्यांनी मी आज चौकीवर आहे, तुम्ही फोटो घेवुन या असे सांगीतले, त्यानंतर मी सापळा पथकातील पोनि श्री आल्हाट साहेब यांना कॉल करुन सदरची माहिती दिली त्यानंतर त्यांनी मला दुपारी दिड वाजता कुकाणा येथे सुरक्षीत ठिकाणी हजर रहणेस सांगीतले, त्याप्रमाणे मी हजर होतो,थोडयाच वेळात तेथे सापळा पथक आले, देवरे मॅडमने मला व पंचांना सुचना दिल्या,त्यानंतर पोलीस निरीक्षक अल्हाट यांनी व्हाईसरेकॉर्डर चालु करुन माझ्याकडे दिले व पंच क्र.1 सह मला खेडकर पोलीस यांची भेट घेण्यासाठी कुकाणा चौकी येथे माझ्याकडील दुचाकी गाडी क्र. एम.एच.14 ए.के.8015 यावरुन रवाना केले.

त्यानंतर आंम्ही कुकाणा पोलीस चौकी येथे जावुन खेडकर पोलीस यांची भेट घेतली,त्यांना मी माझे फोटो त्यांना दिले, त्यावेळी त्यांनी हाताच्या बोटाने पैशाबाबत इशारा करुन किती आणले असे विचारले असता मी त्यांना म्हणालो, एटीएम मधुन आणावे लागतील, त्यावर मी म्हणालो, आपले किती मध्ये ठरले होते, त्यावेळी खेडकर पोलीस यांनी पंचासमक्ष दोन्ही हाताचे पाच पाच बोटे माझ्याकडे दाखवुन एवढे ठरले होते असे सांगितले, मी त्यांना

म्हणालो, दहा नाही होणार दादा,थोडे कमी करा, त्यावर त्यांनी दोन्ही हाताने माझ्याकडे आठ बोटे दाखविली व एवढे करा, आता किती आणले? त्यावेळी खेडकर पोलीस हे हाताच्या बोटाच्या इशा-याने लाच रक्कम मागणी करत होते, त्यामुळे त्यांना शंका येवु नये म्हणुन मी देखील त्यांना हात्याच्या बोटाने इशारा करुन त्यांचेशी तडजोड करत होतो, त्यावेळी मी माझ्या हाताचे पाच बोटे त्यांना दाखविली व एवढयात फिक्स होईल का? असे विचारले त्यांनी सोबत आणले नाही का? असे विचारले असता मी नाही असे म्हणालो, त्यानंतर मी त्यांना म्हणालो, मी आता एटीएम मधुन काढुन आणतो, त्यावर ते म्हणाले, किती आणतो? त्यावर मी त्यांना माझ्या हाताची पाच बोटे दाखविली व लगेच घेवुन येतो असे म्हणालो,त्यावेळी खेडकर पोलीस म्हणाले, नंदुकडे दे, असे म्हणाले, त्यावर मी त्यांना ठिक आहे असे म्हणुन सापळा पथक थांबले त्याठिकाणी पंचासह परत आलो व सदर बाबत देवरे मॅडमला हकिकत सांगीतली,त्यानंतर त्यांनी व्हॉईस रेकॉर्डर मधील संभाशण पंचासमक्ष ऐकले असता मी व पंच क्र.1 यांनी सांगीतलेली हकिकत मिळती जुळती असल्याची खात्री झाली. त्यानंतर नंदु सरोदे यांचे विरुध्द सापळा आयोजीत करण्याचे ठरले.

त्यानंतर पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांनी मला लोकसेवक खेडकर पोलीस यांचे सांगण्यावरुन नंदु सरोदे यांना लाच म्हणुन द्यावयाची लाचेची रक्कम 5,000/- रु. हजर करण्यास सांगितली असता, मी माझे बचतीमधील 5,000/- रु. त्यात 500/- रु. दराच्या 08 व 200/- रुपये दराची 01 व 100/- रुपये दराच्या 08 भारतीय चलनी नोटा हजर केल्या. सापळा पथकातील अंमलदार यांनी सदर नोटांचे नंबर एका को-या कागदावर लिहुन घेतले. त्यानंतर देवरे मॅडम यांनी मला व पंचांना अँन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे गुणधर्म व वापराबाबतची माहिती सांगून, मी हजर केलेल्या नोटांना अँन्थ्रासिन पावडर लावुन त्याचे उजेडात व अंधारात प्रात्यक्षिक दाखविण्यात आले व अँन्थ्रासिन पावडर लावलेल्या लाचेच्या नोटा माझ्या शर्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवुन दिल्या. तसेच मला लाच स्विकारलेनंतर उजवा हात डोक्यावरुन वारंवार फिरविणेचा पुर्वनियोजित इशारा ठरवुन दिला. त्यानंतर नंदु सरोदे कोठे आहेत याबाबत खात्री करण्यासाठी नंदु सरोदे यांना फोन करण्याचे ठरले, त्यानुसार मी नंदु सरोदे यांचा मोबाईल क्र.7499716865 कॉल केला परंतु त्यांनी फोन उचलला नाही.त्यामुळे खेडकर पोलीस यांची भेट घेवुन त्यांचेकडे लाच रक्कम देण्याचे ठरले.

त्यानंतर पोलीस निरीक्षक आल्हाट यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तो माझे ताब्यात देवुन मला व पंच न. 1 अशांना माझेकडील दुचाकी क्र.एमएच-17-बीडब्ल्यु-5092 वरुन खेडकर पोलीस यांची कुकाणा पोलीस चौकी येथे भेट घेण्यासाठी तीन वाजेचे सुमारास रवाना केले व आमचे पाठोपाठ पोनि देवरे मॅडम,पोनि आल्हाट, पंच नं. 2 व सापळा पथक शासकिय वाहनाने कुकाणा पोलीस चौकीजवळ सापळा लावुन थांबुन राहिले. मी पंचासह कुकाणा पोलीस च चौकीमध्ये जावुन खेडकर पोलीस यांची भेट घेतली. त्यावेळी पोपट सरोदे हे देखील तेथे हजर होते, त्यावेळी मी माझ्या शर्टच्या खिष्यातुन लाच रक्कम डाव्या हाताने काढुन खेडकर पोलीस यांचे समोर धरली असता त्यांनी आता किती हे? असे विचारले असता मी हाताचे पाच बोटे दाखवुन पाच हजार असलेबाबत इशारा केला, त्यावेळी खेडकर पोलीस बर.. असे म्हणुन बाजुला उभे असलेले पोपट सरोदे यांचेकडे हात दाखवुन म्हणाले, बाकीचे तीन यांचेकडे दया, मी यांच्याकडुन घेईल, असे म्हणुन त्यांनी माझ्याकडुन पाच हजार रुपये लाच रक्कम स्वीकारली असता मी मला ठरवुन दिलेला लाच स्वीकारले बाबतचा नियोजीत इशारा सापळा पथकास केला असता त्याठिकाणी सापळा पथक आले व खेडकर पोलीस यांना लाच रकमेसह रंगेहाथ पकडले. त्यानंतर पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांनी खेडकर पोलीस यांना त्यांचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव तुकाराम भिमराव खेडकर, वय-35 वर्षे, धंदा-नोकरी, पद-पोलीस नाईक बक्कल नंबर 2127, ह.मु. राधाकिसन गिरी यांचा लव कुश बंगला,मुकींदपूर, नेवासा फाटा, ता.नेवासा, जि.अहमदनगर, मुळ रा. कोनोशी,ता.शेवगाव,जि.अहमदनगर असे सांगीतले.त्यानंतर देवरे मॅडम व सापळा पथकाने सदर कारवाईच्या पंचानाम्याचे कामकाज कुकाणा पोलीस चौकी येथे केले.

तरी दि.12/04/2024 रोजीच्या पडताळणी करावाईच्या वेळी 17.00 ते 21.15 दरम्यान खाजगी इसम नंदु पांडुरंग सरोदे रा. देवसडे,ता.नेवासा, जि.अहमदनगर, यांनी लोकसेवक खेडकर यांना देण्यासाठी माझ्याकडे दहा हजार रुपये लाच मागणी केली व पोपट सरोदे( पुर्ण नाव माहिती नाही) यांनी सदर लाच रक्कम लोकसेवक खेडकर यांना दयावी लागेल असे म्हणाले.तसेच 13/04/2024 रोजी पडताळणीच्या वेळी 14.00 ते 17.15 वा. दरम्यान पोपट सरोदे( पुर्ण नाव माहिती नाही) यांनी साहेबाने नंदुला जेवढे सांगीतले, तेवढे तुला करावे लागेल असे म्हणुन तुला दहा हजार रुपये दयावे लागतील असे म्हणाले. तसेच 16/04/2024 रोजीच्या पडताळणी व सापळा कारवाईच्या वेळी 13.45 ते 15.30 वाजेच्या दरम्यान यातील लोकसेवक तुकाराम भिमराव खेडकर वय-35 वर्षे, धंदा-नोकरी, पद- पोलीस नाईक बक्कल नंबर 2127, ह.मु. राधाकिसन गिरी यांचा लव कुश बंगला,मुकींदपूर, नेवासा फाटा, ता.नेवासा, जि.अहमदनगर, मुळ रा. कोनोशी,ता.शेवगाव,जि.अहमदनगर यांनी माझ्याकडे माझ्यावर नेवासा पोलीस स्टेशन येथे दाखल असलेल्या गुन्हयाचे तपासात सहकार्य करतो म्हणुन दहा हजार रुपये लाच मागणी करुन तडजोडीअंती आठ हजार रुपये लाच रकमेची मागणी करुन प्रथमतः पाच हजार रुपये लाच रक्कम स्वीकारण्याची तयारी दर्शविली व सदर लाच रक्कम सापळा करावाई दरम्यान दिनांक 16/04/2024 रोजी साडेतीन वाजेचे सुमारास पंचासमक्ष कुकाणा पोलीस चौकी येथे स्वीकारली म्हणुन माझी वरील तिघां विरुध्द फिर्याद आहे.

समक्ष

( अनिल श्रीराम शिंदे )

( छाया के. देवरे )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) Transferred to P.S.
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):

on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14 Signature/Thumb impression of the complainant / informant.
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Shinde. A S

15. Date and time of dispatch to the court
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Signature of Officer In charge, Police Station
(ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची स्वाक्षरी)

पोलीस ठाणे अंमलदार
नेवासा पोलीस स्टेशन

Name (नाव): DHANANJAY ANANTF
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.): POBN67095